आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ६ एप्रिल २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : २४ । पाने : ४ । मूल्य २ ₹



**शासनाला साथ द्या!**

कोरोना लढा सर्व पातळ्यांवर लढला जात असताना शासनाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, ही जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने वर्तमान माध्यम समुहाची जनतेला कळकळीची विनंती करत आहोत.

## दिग्गजांच्या उपस्थितीत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे भूमिपुजन

▶ प्रतिनिधी

मुंबई : दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानाजवळील महापौर निवास येथे विकसित करण्यात येत असलेल्या बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपुजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उद्योग मंत्री तथा स्मारकाचे सचिव सुभाष देसाई, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री अनिल परब, महापौर किशोरी पेडणेकर, खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, राहुल शेवाळे, विनायक राऊत, आमदार सदा सरवणकर, रोहीत पवार, मुख्य सचिव सिताराम कुंटे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त आर. ए. राजीव, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे आदी मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते महापौर निवासाच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते कळ दाबून स्मारकाच्या कामाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रांगणामध्ये वृक्षारोपण देखील करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत स्मारकाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. या ठिकाणी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात चित्रफितीच्या माध्यमातून स्मारकाविषयी सादरीकरण करण्यात आले. मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांसह वास्तुविशारद आभा लांबा, विकासक टाटा कंपनीचे विनायक देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी संबंधातील बंधने लक्षात घेऊन मोजक्या उपस्थितांसह या भूमिपूजन समारंभाचे नियोजन करण्यात आले होते. त्याचे ऑनलाईन थेट प्रक्षेपण देखील करण्यात आले.राज्य शासनाने या स्मारक योजनेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प समन्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती केली आहे. स्मारकासाठी भू वापर व पर्यावरणासंबंधीच्या सर्व परवानग्या घेण्यात आल्या असून वास्तू उभारणीचा पहिला टप्पा १४ महिन्यांमध्ये पूर्ण केला जाणार आहे. या ठिकाणी वस्तुसंग्रहालय, कलादालने, संशोधन केंद्र, संग्राहागार, वाचनालय, चर्चासत्रांसाठी सभागृह असणार असून बाळासाहेबांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या संग्रहालयाला आणि स्मारकाला अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड देण्यात येणार आहे.



## फास्टट्रॅकन्यूज

### दिलीप वळसे पाटील महाराष्ट्राचे नवे गृहमंत्री



मुंबई: गृहमंत्री अनिल देशमुख यांचा राजीनामा स्वीकृत करावा, असे विनंती पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना दिले आहे. गृह विभागाचा कार्यभार दिलीप वळसे पाटील यांच्याकडे देण्यात यावा, असेही या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे दिलीप वळसे पाटील हे राज्याचे नवे गृहमंत्री असतील यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे. दरम्यान, शरद पवार यांचे पीए ते राज्याचे नियोजित गृहमंत्री असा दिलीप वळसे पाटील यांचा थक्क करणारा प्रवास आहे. पाटील यांच्याकडे सध्या असलेला कामगार विभागाचा अतिरिक्त कार्यभार हसन मुश्रीफ व राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अतिरिक्त कार्यभार उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्याकडे देण्याबाबत देखील पत्रात विनंती करण्यात आली आहे. ही माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### राजेंद्र सरग कोरोनाचे बळी



पुणे: जिल्ह्याचे माहिती अधिकारी व प्रसिद्ध व्यंगचित्रकार राजेंद्र सरग यांचे शनिवारी कोरोनामुळे निधन झाले. ससून रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. एक कार्यक्षम, मनमिळावू अधिकारी व पत्रकारांचे मित्र असलेल्या सरग यांच्या अकाली निधनामुळे प्रशासकीय व माध्यम क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. राजेंद्र सरग यांनी पुण्याबरोबरच बीड, अहमदनगर, परभणी अशा अनेक ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी म्हणून काम केले होते. व्यंगचित्र रेखाटन हा त्यांचा छंद होता. राज्यातील विविध दैनिके, साप्ताहिके व दिवाळी अंकांसाठी गेल्या अनेक वर्षापासून ते मोफत व्यंगचित्र करून देत असत. मदतीला धावून जाण्याच्या स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. सरग यांच्या परीवारावर कोसळलेल्या दु:खात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

### 'गोव्यातल्या समान नागरी कायद्याचा अभ्यास करावा'



पणजी : युनिफॉर्म सिव्हिल कोड अर्थात समान नागरी कायद्यावरुन सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी शनिवारी गोव्यात लागू असलेल्या या कायद्याचे कौतुक केले आहे. हा कायदा कसा काम करतोय हे बुद्धीवाद्यांनी इकडे येऊन पहावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. ज्या कार्यक्रमात सरन्यायाधीशांनी हे विधान केले त्या कार्यक्रमात न्यायमूर्ती एन.व्ही.रमना आणि केंद्रीय कायदा मंत्री रविशंकर प्रसाद यांच्यासह इतर लोक उपस्थित होते. या कायद्यानुसार मला न्याय देण्याचे भाग्य लाभले, असे ते म्हणाले.

# लॉकडाऊन शिथील, मात्र कडक निर्बंध

## अत्यावश्यक सेवा सुरू राहणार : जिल्हाधिकारी रविंद्र जगताप

▶ प्रतिनिधी



बीड : जिल्ह्याचे लॉकडाऊन शिथिल झाल्या नंतर राज्याचे निर्बध लागू होते. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी राज्य सरकारने कडक निर्बध जारी केले. त्यासंदर्भात सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले. त्यानुसार अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, मॉल्स पूर्ण दिवस बंद राहणार आहेत. या आदेशानंतर व्यापारी वर्गाला धक्का बसला. जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांनी जारी केलेले हे आदेश आता ३० एप्रिलपर्यंत लागू राहणार आहेत.

**हे सुरू राहणार**

रुग्णालय, रोगनिदान केंद्र, क्लिनिक, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध दुकाने, औषध निर्मिती उद्योग, इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवाए किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, दूध डेअरी, बेकरी, मिठाई , खाद्य दुकाने, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जसे की, रेल्वे, टॅक्सी, ऑटो रिक्षा आणि सार्वजनिक बसेस, स्थानिक प्राधिकरणाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा, मालाची, वस्तूंची वाहतूक, शेतीसंबंधित सेवा, इ-कॉमर्स, मान्यताप्राप्त वृत्तपत्रे आणि त्याच्याशी संबंधित सेवा, स्थानिक आपत्ती प्राधिकरणाने निश्चत केलेल्या अत्यावश्यक सेवा सुरू राहतील. अत्यावश्यक सेवा असलेली दुकाने सामाजिक अंतर ठेवून, दुकानासमोर चिन्हांकित चौकट ओढून, ग्राहकांना प्रतीक्षा कक्षात बसवून सुरू ठेवता येणार आहेत.

**हे बंद राहणार?**

अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, बाजारपेठा, मॉल्स, पूर्ण दिवस बंद राहणार आहेत. सर्व केश कर्तनालय, स्पा, सलून, ब्युटी पार्लर बंद राहणार आहेत.

या आदेशाने बंद करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या दुकानांमध्ये काम करणाऱ्या सर्व कामगारांचे भारत सरकारकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. अत्यावश्यक सेवांच्या दुकानांमध्ये ग्राहक संवाद साधण्यासाठी सुरक्षा उपाय करावेत. असे राज्य शासनाचे निर्देश आहेत.







## प्रयोगशील शेतकऱ्याचा शासनाकडून सन्मान

### अण्णासाहेब जगताप यांना वसंतराव नाईक पुरस्कार जाहीर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सावरगाव येथील प्रयोगशील शेतकरी अण्णासाहेब अर्जुनराव जगताप यांना २०१९ चा महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला आहे. या सन्मानाने एका प्रयोगशील शेतकऱ्याचा यथोचित सन्मान झाला आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने बुधवारी घोषणा केली. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून विविध प्रयोग करून जमिनीला 'सकस' करण्याच्या त्यांच्या कामगिरीचा हा शासनाने केलेला गौरव ठरला आहे. मागील दहा वर्षापासून अण्णासाहेब जगताप सेंद्रिय शेतीचा एकनिष्ठेने प्रसार आणि प्रचार करत आहेत.



माजी आमदार मोहनराव सोळंके यांच्यासह जगताप कुटूंबीय

महाराष्ट्र राज्यात कृषी, कृषी संलग्न क्षेत्र आणि फलोत्पादन या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०१८-१९ या वर्षाकरिता कृषी पुरस्कारांची घोषणा कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने ३१ मार्च रोजी केली आहे.

यात माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील प्रयोगशील शेतकरी अण्णासाहेब अर्जुनराव जगताप यांना २०१९ चा महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला आहे. अण्णासाहेब हे सेंद्रिय शेतीचा मागील १० वर्षापासून प्रसार आणि प्रचार करत आहेत. त्यांचे युट्यूब वर 'दिशा सेंद्रिय शेती' असे चॅनलसुद्धा आहे. यावरून ते संेदीय शेतीच्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखवतात. या पुरस्कारामुळे अण्णासाहेब जगताप यांचे कौतुक केले जात आहे.

### सेंद्रिय शेतीचा प्रसार व्हावा

सेंद्रिय भाज्यांचा माणसांच्या शरीरावर सकारात्मक परिणाम होतात. तसेच परिणाम सेंद्रिय शेती केल्याने जमिनीवर होतात. विषमुक्त पिके जोमाने येतात आणि साहजिकच त्यांची पौष्टिकता वाढते. सुरुवातीला सेंद्रिय शेती करताना अनेक अडचणी आल्या. परंतु, न डगमगता मी माझ्या प्रयोगांवर ठाम राहिलो. गावातील इतर शेतकरी सुरुवातीला हिणवायचे आता मदतीला तत्पर असतात. सध्या माझ्याकडे भाज्या, गाजर, धान्य यांची विविध प्रकारची गावरान ६० बियाणे आहेत. या बियाणांना गोवा, मध्य प्रदेश, कर्नाटक येथून मोठी मागणी आहे. हा व्यवसाय नाही मात्र सेंद्रिय शेतीचा प्रसार व्हावा हाच उद्देश आहे. पुढच्या पिढीवर नापिकी जमिनीचे मोठे संकट येणाऱ्या काळात उद्भवणार आहे. त्यावर मात करावयाची आहे, असे अण्णासाहेब जगताप म्हणाले.



संपादकीय

# महामंडळांची रखडगाडी

महामंडळांच्या नियुक्त्या रखडगाडीप्रमाणे मंदावल्या आहेत. याबाबत शासनाने तत्परता दाखवण्याची गरज निर्माण झाली आहे. नुकत्याच आटोपलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात वैधानिक मंडळांच्या मुदतवाढीचा आणि त्यावरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावर आधी विधान परिषदेच्या आमदारांची नियुक्ती करा मग मंडळांचे बघू, अशी भूमिका सरकारने घेतली. तुम्ही शिंगरू मारले म्हणून आम्ही घोडा मारू, अशा राजकारणापुरता मंडळांच्या मुदतवाढीचा किंवा अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचा विषय नाही. राज्यातील विकासाचा समतोल साधण्याची फार मोठी जबाबदारी या मंडळांकडे आहे. राज्यपालांनी सत्ताधारी पक्षाने पाठवलेली आमदारांची यादी थांबवली म्हणून महामंडळांची परवड हे सरकार करणार आहे, हे स्पष्ट आहे. राज्यपालांच्या आधिपत्याखाली कार्यरत असलेली वैधानिक विकास मंडळे निष्प्रभ करण्याचा हा प्रयत्न आहे. दर पन्नास कोसावर भाषा, संस्कृती बदलणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेच्या समस्या, प्रश्नही प्रत्येक टप्प्यावर बदलत जातात. राजधानीत बसून सगळ्या समस्यांवर तोडगा काढणं, सगळ्या प्रश्नांची उत्तरं सरकारनं शोधणं हे मान्य, पण त्यासाठी सरकार दरबारापर्यंत त्या-त्या ठिकाणच्या समस्या मांडल्या जाणं किंवा सरकारला प्रादेशिक स्तरावरील सर्वसामान्यांच्या गरजांची जाणीव करून देणंही महत्त्वाचं आहे. त्यासाठी केवळ सरकारी दप्तरं आणि अधिकारी पुरेसे नाहीत. त्यातून वैधानिक विकास मंडळांची संकल्पना पुढे आली. अर्थात वैधानिक विकास मंडळांची स्थापना होण्यासाठीही संयुक्त महाराष्ट्रात तब्बल साडेतीन दशकं जावी लागली. सरकार नावाच्या यंत्रणेकडून लोककल्याणकारी सगळ्या योजना, सगळ्या तरतुदी या समतोल पद्धतीने आणि कोणताही पक्षीय, प्रादेशिक अभिनिवेश न ठेवता राबवायला हव्यात हे अपेक्षित असतं. पण ही केवळ अपेक्षा असते. प्रत्यक्षात राज्याच्या कारभाऱ्यांकडून अपेक्षापूर्ती होईलच याची खात्री देता येत नाही. कारभाऱ्यांकडून कधीतरी विकास गंगा पोहोचवताना असमतोल होणारच. त्यातूनच एका भागात विकास गंगा वाहत असताना दुसऱ्या भागात मात्र विकासाचा दुष्काळ होणं स्वाभाविक आहे. विकासाचा असा दुष्काळ वर्षानुवर्ष कायम राहिला की, मग एकाच राज्यातच विकासाचा प्रादेशिक असमतोल तयार होतो. एक प्रदेश संपन्न होत असतानाच दुसऱ्या प्रदेशाची बिमारू म्हणून संभावना होते. विकासाचा अनुशेष वाढत जातो. आपण दुर्लक्षित आहोत, ही भावना लोकांमध्ये सबळ व्हायला लागते. असाच प्रकार महाराष्ट्रात घडत होता, पश्चिम महाराष्ट्रात विकासाची गंगा धो-धो वाहत असताना विदर्भ, मराठवाडा आणि कोकण कोरडं ठाक होतं. चांदा ते बांदा असा राज्याचा भौगोलिक विस्तार बघता प्रादेशिक विकासाचा असमतोल झाला, हा राजकीय आरोप नाही. सरकारच्या आकडेवारीवरूनच विकासाचा असमतोल पुढे स्पष्ट झाला, परंतु त्यासाठी ३४ वर्ष दुर्लक्षित भागातील जनतेला प्रतीक्षा करावी लागली. १९५३ मध्ये झालेल्या नागपूर करारानंतर तत्कालिन बेरार प्रांताचा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्राची होती. हा करार अस्तित्वात आला, संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. पण विदर्भ, मराठवाडा, कोकणातील मराठी माणसाच्या विकासाकडे संयुक्त महाराष्ट्राचं लक्ष जाण्यासाठी एक जानेवारी १९९४ हा दिवस उजाडला. तोपर्यत पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत राज्यातील इतर भागांचा समन्यायिक, समतोल विकास झाला की, नाही हे पाहिलंच गेलं नाही. १९८४ मध्ये दांडेकर समितीनं पहिल्यांदा विविध नऊ क्षेत्रांना आधारभूत मानून अनुशेषाचा हिशेब मांडला आणि विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळांची स्थापना झाली. दर पाच वर्षानी या वैधानिक मंडळांना सरकारकडून ३० एप्रिल २०२० पर्यत मुदतवाढ मिळाली. मंडळं अस्तित्वात आल्यानंतर प्रादेशिक विकासाचा समतोल साधण्यासाठी प्रयत्न झालेत. १९९४ मध्ये असलेला विकासाचा अनुशेष भरून काढला गेल्याचा दावा सरकार करतंय. त्यामुळे आता मंडळांची गरज केवळ राजकीय नियुक्त्यांपुरतीच असल्याचं चित्र महाविकास आघाडीकडून रंगवलं जातंय. पण वैधानिक मंडळांची स्थापना झाल्यापासून विकासाचा अनुशेष भरून निघाला हा सरकारचा दावा अर्धसत्य आहे. मंडळांच्या माध्यमातून केवळ आर्थिक अनुशेष भरून काढण्यात आला. आजही विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील भौतिक अनुशेष कायम आहे. ज्या नऊ क्षेत्रांना आधार मानून अनुशेषाचा हिशेब मांडला गेला होता, त्यात आत्ताचे सर्वाधिक महत्त्वाचे उद्योग, सेवा उद्योग या क्षेत्रांचा समावेश नव्हता. आजच्या जीडीपीमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा अधिक वाटा असलेल्या या दोन क्षेत्रांसह एक लाख सात हजार हेक्टर क्षेत्राच्या सिंचनाचाही भौतिक अनुशेष कायम आहे. याकडे सरकारला बघावं लागणार आहे. वैधानिक विकास मंडळं ही राज्यपालांच्या नेतृत्वात कार्यरत असतात. प्रादेशिक असमतोल दूर करून समन्यायिक विकास राज्यात व्हायला हवा, ही या मंडळांकडून असलेली अपेक्षा. पण या मंडळांना एक वर्षापासून अद्याप मुदतवाढ मिळालेली नाही. मंडळाच्या अध्यक्षांना मिळणारी लाल दिव्याची गाडी, अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीतील राजकारण इतक्या वरवरच्या राजकारणाचा हा मुद्दा नक्कीच नाही. विकासाचा समतोल बिघडून जनक्षोभ निर्माण होऊ नये, याची काळजी घेणारी ही मंडळं आहेत. त्याकडे आघाडी सरकारला दुर्लक्ष करता येणार नाही. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात वैधानिक मंडळांच्या मुदतवाढीचा आणि त्यावरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावर आधी विधान परिषदेच्या आमदारांची नियुक्ती करा मग मंडळांचं बघू, अशी भूमिका सरकारनं घेतली. वैधानिक मंडळांचा विकासासाठी किती उपयोग झाला, हा भाग अलाहिदा. परंतु, राज्यपाल नियुक्त आमदार ही राजकीय सोय आहे. ही सोय होत नाही, तोपर्यत वैधानिक मंडळांच्या माध्यमातून अपेक्षित विकासाची प्रक्रिया थांबवणे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे आमदारांच्या नियुक्तीला हिरवा कंदील मिळाला किंवा नाही, तरीही वैधानिक मंडळांवर सदस्यांची नियुक्ती न करणे विकास प्रक्रियेतील अडथळाच ठरणार आहे. याबाबत सरकार गंभीर का नाही हा खरा सवाल आहे.

# कोरोनामुक्तांनी लस घ्यावी का?

**कोरोनाची लस शरीराला वायरसशी दोन हात करणाऱ्या अँटिबॉडी पुरवण्याचं काम करते. म्हणूनच कोरोनापासून वाचण्यासाठी सगळे जबाबदारीनं लस घेतायत. पण ज्यांना आधीच कोरोना होऊन गेलाय, त्यांचं काय? कोरोनातून बरं झालेल्या माणसांच्या शरीरात अँटिबॉडी आपोआप तयार झालेल्या असतात. मग अशा माणसांनी लस घ्यायची की नाही?**

आज-काल

रेणुका कल्पना

कोरोनाचा कहर वाढतोय म्हणून एकीकडे सरकारकडून ३ एप्रिलपासून काही शहरात मिनी लॉकडाऊन घोषित केलाय. तर दुसरीकडे लसीकरणाची मोहीमही दणक्यात सुरूय. १ एप्रिलला ४५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या लोकांसाठी लसीकरण सुरू केलं. पहिल्याच दिवशी देशात ३३ लाख लोकांना लसीचा पहिला डोस दिल्याचं तर ३ लाख लोकांना लसीचा दुसरा डोस दिल्याचं, केंद्रीय आरोग्य खात्याच्या आकडेवारीतून सांगण्यात आलंय.

२ एप्रिल सकाळी ७ वाजता प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार भारतात आत्तापर्यत जवळपास ६ कोटी लोकांना लस मिळालीय. कोरोनापासून वाचण्यासाठी सगळेच नागरिक जबाबदारीनं लस घेतायत. पण ज्यांना कोरोना होऊन गेला आहे, त्यांचं काय? लस येण्याआधीच कोरोनाची लागण झालेल्या आणि त्यातून बरं झालेल्या लोकांनी कोरोनाची लस घ्यायची की नाही?



लसीची गरज काय?

लसीचं काम असतं शरीराला वायरसची ओळख करून देणं. म्हणूनच लसीत त्या आजाराचेच अर्धमेले किंवा इनऍक्टिव वायरस असतात. असे वायरस शरीरात आले की त्याविरोधातली रोगप्रतिकारक शक्ती म्हणजेच अँटिबॉडी तयार होतात. मग पुन्हा कधीही खरंच संसर्ग झाला तरी त्याचा फार त्रास होत नाही. पण लस न घेता कोरोनाचा संसर्ग झाला तरी हीच प्रक्रिया घडते. शरीर वायरसशी दोन हात करतं. आपण त्यातून बरे होतो म्हणजेच त्याविरोधातल्या अँटिबॉडी आपल्या शरीरात तयार होतात. थोडक्यात, जे काम लस करणार असते ते शरीरात आधीच झालेलं असतं. मग लसीची काय गरज? असं टाइम्स ऑफ इंडियाच्या एका लेखात 'इंडियन काऊन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च'चे डायरेक्टर आणि साथरोगतज्ञ देबप्रसाद चट्टोपाध्याय यांनी म्हटलंय. कांजण्यांसारख्या मोठ्या आजारात एकदा आजार होऊन गेला की परत लस घ्यायची गरजही नसते, असं प्राथमिकरित्या दिसतं. पण कोरोनासारख्या फ्लू आजारांना हे पुरेसं होत नाही, असंही अनेक तज्ञांचं मत आहे. त्यामुळे कोरोनातून बरं झालेल्या लोकांनी कोरोनाची लस घ्यायची की नाही याबाबत तज्ञांची मतं विभागलेली दिसतात.

९० दिवसांनंतर लस हवीच

'सेंटर फॉर डिसीज कंट्रोल' या अमेरिकेतल्या संस्थेनं आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या प्रश्नोत्तरात कोरोना झाला असेल तरी लस घ्यायलाच हवी, असं सांगितलंय. कोरोनातून बरं झाल्यानंतर काही एक रोगप्रतिकारक शक्ती मिळते हे खरंय. पण ही रोगप्रतिकारक शक्ती किती काळ टिकते याबाबत अजून तज्ञांना पुरेशी माहिती नाहीय. तुम्ही कोविड १९ मधून बरे झाला असाल तरी तुम्हाला पुन्हा कोरोनाचा संसर्ग व्हायची शक्यता आहे. ही शक्यता कमी असली तरी नाकारता येणार नाही,' असं सीडीसीनं म्हटलंय. 'द न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन' या जर्नलमधे प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार कोरोना वायरसचा संसर्ग आणि लस एकत्र आले तर अतिशय चांगली रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होऊ शकते. संसर्ग झालेल्यांनी लसीचे दोन्ही डोस घेतले तर संसर्ग न झालेल्यांच्या तुलनेत ६ पटींनी जास्त अँटिबॉडी तयार होतात, असं या संशोधनात सांगितलंय. पण, संसर्ग झाल्यामुळे आधीच अँटिबॉडी तयार झालेल्या असतात. त्यात लस घेतली तर त्याने रोगप्रतिकारक शक्ती जास्त वाढते. याचा अर्थ लस घेण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःला वायरसचा संसर्ग करून घ्यायला हवा, असा होत नाही. महत्त्वाचं म्हणजे, संसर्ग झाल्यानंतरही लस घ्यायची असेल तर त्यासाठी ९० दिवस वाट बघण्याचा सल्ला सीडीसीने दिलाय. मोनोक्लोनस अँटिबॉडी म्हणजे, मानवनिर्मिती अँटिबॉडीचा वापर करून किंवा प्लाझमा थेरपीने तुमच्यावर उपचार केले गेले असतील तर लस घेण्यासाठी ९० दिवस थांबणं आवश्यक आहे. आपल्या डॉक्टरांना विचारून आपल्यावर कोणते उपचार केले गेलेत ते आपण शोधून काढू शकतो. असे कोणतेही उपचार केले नसतील तर आजारातून पूर्णपणे बरं झाल्यानंतर कधीही लस घेता येईल. पण सर्वासाठी लसीची उपलब्धता, उत्पादन आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसवताना सगळ्यांनीच ९० दिवसांची वेळ पाळली तर प्रशासनाला जास्त सोपं पडेल, असं सीडीसीनं म्हटलंय.

एकच डोस पुरेसा

१ एप्रिल २०२१ ला 'नेचर मेडिसिन' या जर्नलमधे प्रकाशित झालेल्या एका रिसर्च पेपरमधे कोरोनातून बरं झालेल्यांना कोरोनाच्या लसीचा एकच डोस घेणं पुरेसं ठरेल असं सांगण्यात आलंय. अमेरिकेल्या लॉस एंजेल्समधल्या 'सेडर्स सिनाई मेडिकल सेंटर'मधे करण्यात आलेल्या संशोधनावर हा रिसर्च पेपर लिहिला गेलाय. कोविड १९ मधून बरं झालेल्या पेशंटना फायझर लसीचा पहिला डोस दिला तर त्यांच्यात कधीही संसर्ग न झालेल्या आणि लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या लोकांएवढ्याच प्रमाणात अँटिबॉडी सापडतात, असं या पेपरमधे लिहिलंय..कोरोनाच्या लसीचा पहिला डोस शरीरात अँटिबॉडी तयार करतो. पण दुसरा डोस मिळाला की ही अँटिबॉडी तयार करण्याची प्रक्रिया एकदम जोरात होऊ लागते. म्हणूनच या दुसऱ्या मात्रेला बुस्टर शॉट' असं म्हणतात. कोरोनाचा संसर्ग झाल्यामुळे आधीच काही प्रमाणात शरीरात अँटिबॉडी तयार झाल्या असतात. त्यामुळे संसर्ग झालेल्या लोकांसाठी लसीचा पहिलाच डोस बुस्टर शॉटसारखं काम करतो. त्यामुळे संसर्ग झालेल्यांसाठी लसीचा पहिलाच डोस पुरेसा असेल.

नेमकं काय करायचं?

अमेरिकेतल्याच 'इकहान स्कूल ऑफ मेडिसिन'कडून करण्यात आलेल्या संशोधनातही लसीचा पहिला डोस पुरेसा असल्याचं सांगितलंय. तरीही सीडीसीने संसर्ग झालेल्यांसाठी लसीचे दोन डोस गरजेचे असल्याचीच भूमिका घेतलीय. सीडीसीची भूमिका एकप्रकारे योग्यच आहे असं म्हणता येईल. एकदा संसर्ग झाल्यानंतरही कोरोनाची पुन्हा लागण झाल्याचं आपण सगळ्यांनीच वाचलं असेल. किंवा अनेकदा कोरोना वायरस म्युटेट झाल्यामुळेही कोरोनाची पुन्हा लागण होण्याची शक्यता असते. अशात, कोरोनाची लस घेऊन जास्त रोगप्रतिकारक शक्ती मिळवणं हा नेहमीच चांगला पर्याय ठरेल. शिवाय, संसर्ग झालेल्यांनी कोरोना लसीचे दोन्ही डोस घेतल्यावर त्यांना कोणतेही साईड इफेक्ट झाल्याचं संशोधनातून समोर आलेलं नाही. म्हणजेच, संसर्ग झाल्याने लस घेतली तर काही तोटा होणार नाहीय. झाला तर फायदाच होईल. त्यामुळे संसर्ग झाला असला तरी लसीचे दोन्ही डोस घ्यायलाच हवेत. पण भारतात लसीचा तुटवडा निर्माण होत असताना संसर्ग न झालेल्यांबरोबरच तो झालेल्यांसाठीही लस कशी पुरवणार हे सरकार समोरचं मोठं आव्हान असणार आहे.

# ऑनलाइन शिक्षणाचे मृगजळ

**आधुनिक युगात जगत असताना सर्व काही सुधारित होत गेलं काही क्वचित गोष्टी सोडता सर्व काही या प्रवाहाशी एकरूप होत आलं शिक्षण ही त्याला अपवाद ठरलं नाही. क्षणभरही एकठिकाणी न बसणारे तुम्ही, आम्ही कोरोना नावाच्या महाभयंकर रोगामुळे बंदिस्त झालोत, सर्वकाही ठप्प झाले या रोगाने समस्त मानवजातीवर 'न भूतो न भविष्यती' असे वाईट परिणाम दाखवून दिले, संपूर्ण जगाला हादरवून सोडले.नंतर मात्र टाळेबंदीच्या काळात प्रत्येक गोष्टीला पर्यायी गोष्टी शोधून सर्वकाही सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले व यातच शिक्षण थांबलं नाही पाहिजे ही महत्वकांक्षा बाळगून ऑनलाइन शिक्षणाची संकल्पना राबवायला सुरुवात करण्यात आली.**

शैक्षणिक

आदेश शिंदे



या ऑनलाइन शिक्षणामुळे झालं काय तर, शिक्षणाचा संबंध हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी आला पाहिजे परंतु आज आमच्या विद्यार्थ्यांकडे कोणत्या प्रतीचा महागडा स्मार्टफोन आहे याच्यावर तो संबंध जोडला जाऊ लागला, शैक्षणिक ज्ञानातून विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, तृष्णा वाढायला हवी परंतु आमचा विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणाच्या नावाखाली गेमिंग कडे कुठेतरी आकर्षित होताना दिसत आहे, पालक वर्ग विद्यार्थी मोबाइल मध्ये काय करतोय हे पूर्ण वेळ पाहू शकत नाहीत हे वास्तव आहे व ते नाकारणंही शक्य नाही. ऑनलाईन शिक्षण कुठंतरी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशीही खेळ करताना दिसत आहे, पर्यायी शिक्षण घेत असताना या गोष्टी होणं साहजिकच आहे परंतु त्यातून विद्यार्थ्यांमध्ये मानसिक अस्वस्थता निर्माण होत आहे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. अनेकांचं म्हणणं अस येत की जगाच्या कानाकोपऱ्यात मी कुठेही असलो तरीही ऑनलाइन शिक्षणामुळे मी माझं शिक्षण पूर्ण करू शकतो, ही खूप आनंदाची गोष्ट आहे. परंतु तुम्ही अन् आम्ही अशा देशात राहतो जिथल्या कित्येक प्रवर्गांना कागदोपत्री स्वतःच अस्तित्व निर्माण करणं आजच्या या स्वतंत्र भारतात जवळपास शक्य होत नाही, होय मी बोलत आहे आदिवासी समाजबांधवांबद्दल. त्यांच्यापर्यत शिक्षणाची गंगा पोहचवण्यासाठी अथक परिश्रम करण्यात आलेले आहेत तेव्हा कुठेतरी आदिवासी भागातील अशी मंडळी शिक्षण घेऊ शकतेय.परंतु ऑनलाइन शिक्षणाच्या नावाखाली ही मंडळी कुठेतरी शिक्षणापासून वंचीत राहतेय की काय? अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर ऑनलाइन शिक्षण सर्वदूर राबवत असताना समाजातील प्रत्येक घटकांचा विचार करण्यात आलेला नाहीय? असा तर त्याचा अर्थ होत नाहीय ना?

ऑनलाइन शिक्षण प्रत्येक पाल्यांपर्यत पोहचवण्यास प्रत्येक पालक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे असं नाहीय. त्याचेच फळ म्हणून, आपल्या मुलाला आपण ऑनलाइन शिक्षणासाठी लागणारा लॅपटॉप घेऊन देऊ शकत नाहीत याची जाणीव होताच उस्मानाबाद जिल्ह्यातील,कळंब तालुक्यातील महादेव बिक्कड नावाच्या शेतकरी बापाने आत्महत्या करत स्वतःची जीवनयात्रा संपवली. मग निश्चितच या आत्महत्यास प्रवृत्त कोणी केलं? हा प्रश्न पडणं साहजिकच आहे आणि त्या उत्तराच बोट कुठेतरी ऑनलाइन शिक्षणाकडे जाताना स्वतःची सद्सद्विवेकबुद्धी जाग्यावर ठेवत विचार करणाऱ्या प्रत्येकाला दिसत आहे! हे सर्वकाही पाहून अजून एक प्रश्न पडेल, ऑनलाइन शिक्षण आर्थिक विषमता निर्माण करण्याच काम करत आहे का? ऑनलाइन शिक्षणाच्या धोरणामध्ये एका गोष्टीमुळे विद्यार्थ्यामध्ये प्रचंड गोंधळलेली परिस्थिती निर्माण झालेली आहे ती म्हणजे परीक्षा. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षाही ऑनलाइन/ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने घेण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु याच वेळी दहावी, बारावीच्या परीक्षांच्या वेळी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना ऑनलाइन/ऑफलाईन परीक्षांचे माध्यम देण्यास शासनाची उदासीनता दिसून येते, तसेच mpcs च्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होतात,मग मात्र या वेळी नेमके कोणते निष्कर्ष लावले गेले आहेत हे समजण्याचे पलीकडे आहे.कुठंतरी शासनाची यातून दुजाभावाची भावना दिसून येतं आहे का? शिक्षणाचं माध्यम जरी वेगळं असलं तरी विद्यार्थी हा केंद्रबिंदु आहे ना? मग याला नेमकं काय समजायचं, यामुळे विद्यार्थी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. राहिला प्रश्न ऑनलाइन परीक्षेचा तर ऑनलाइन परीक्षेचा फज्जा उडालेला दिसून येत आहे. अगदी घोळक्यांनी मित्र मैत्रिणी बसून परीक्षेत असलेले प्रश्न गुगल बाबाच्या माध्यमातून शोधून काढत हर्षोउल्हासत परीक्षा देत आहेत, पास व्हायचं तर स्क्रिनशॉट घे अन पाठव रे हे समीकरण दिसून येत आहे. यामध्ये नेमकी कोणाची फसवणूक होतेय? हे विद्यार्थ्यांना समजत नाहीय ही शोकांतिका. त्याचबरोबर ऑनलाइन शिक्षणातून विद्यार्थ्यांपर्यत ज्ञान आदानप्रदानाच काम किती पोहचल या वरही प्रश्नचिन्ह आहे उभं आहे हे मात्र खरं!

क्रांतिसूर्य महात्मा फुले अस म्हणतात की - तत्वाला तत्वाची जाणीव करून देणे म्हणजे शिक्षण होय. परंतु ऑनलाइन शिक्षण यावेळी कुठंतरी अयशस्वी होताना दिसत आहे.मग ही पर्यायी शिक्षण व्यवस्था आमच्या माथी मारण्यात आलेली आहे का? ऑनलाइन शिक्षणाचा हिशोब कधी आम्हाला कळलाच नाही. कशाला कितीने गुणले की किती अधिक होतात अन् कशाला कितीने भागीले की किती वजा होतात, ऑनलाइन शिक्षणाची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करत असताना आमच्या हातात शून्यच उरले आहे. आकाशात पडणाऱ्या गारांना अलगद मुठीत साठवावे अन् मूठ उघडताच त्या गारांच पाणी व्हावं असच काहीतरी ऑनलाइन शिक्षणाचं बाबतीत घडलं आहे हे मात्र खरं!! मग हे सर्व पाहता याला ऑनलाइन शिक्षणाचं मृगजळ का म्हणू नये बर?

# रयतेच्या राजाची अष्टसुत्री

**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि अवघ्या जगाने कौतुक करावे, असे व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. ३ एप्रिल,रोजी शिवाजी महाराज यांचा पुण्यदिन होता. शिवाजी महाराजांच्या अनेक गोष्टी आजही समाजाला प्रेरणा देतात. चला तर मग जाणून घेऊया छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाच्या अष्टसुत्रीबद्दल.**

१) जिद्द आणि बुध्दीमत्ता

शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापन करताना अनेक अडचणी आल्या. प्रत्येक टप्प्यावर अडचणींवर मात करूनच महाराज पुढे गेले. कधी निराश झाले नाहीत, जिद्दीने, चातुर्याने आणि बुद्धी वापरून शिवाजी महाराजांनी समस्यांवर मात करत प्रचंड यश संपादन केले आणि स्वराज्याची स्थापना केली.



२) माणुसकी आणि आपलेपणा

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांवर व रयतेवर जीवापाड प्रेम केले. जाती-पातीच्या भिंती तोडून सर्वांना सन्मान दिला. एखादा मावळा धारातिर्थी पडला की, कणखर आणि अविचल महाराजांच्या डोळ्यात पाणी यायचे. या आपलेपणामुळेच महाराजांच्या एका शब्दासाठी मरायला आणि मारायल मावळे तयार होत.

३) कणखर आणि दूरदृष्टी

छत्रपती शिवाजी महाराज कणखर होते. त्यांना प्रगाढ दूरदृष्टी होती. स्वराज्यासाठी काय काय केले जाऊ शकते, याचा विचार त्यांच्याकडे होता. शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीमुळे छत्रपती राजाराम दक्षिणेत सुखरुप राहू शकले.

४) भयमुक्त आणि व्यवस्थापन : आपल्यापेक्षा प्रबळ शत्रुला शिवाजी महाराज कधीही घाबरले नाही. महाराजांची कार्यपद्धती नेमकी असायची. नियोजन करणे, माहिती गोळा करणे, जबाबदाऱ्या निश्चित करणे, यामुळे शिवाजी महाराजांना मोठे यश मिळत गेले.

५) तणावमुक्त आणि सकारात्मकता : अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही निराश न होता महाराजांनी असे पराक्रम करून दाखवले आहेत, जे केवळ ऐकल्यामुळे अनेकांच्या भुवया आजही उंचावतात. महाराजांची मानसिक ताकद पराकोटीची होती. कितीही संकटे आली, तरी त्यांनी शांत राहून त्यातून मार्ग काढला. सकारात्मक गोष्टींचा आग्रह धरला.

६) साधी राहणी आणि उच्च विचारसरणी

छत्रपती शिवाजी महाराजांची राहणी एकदम साधी होती. स्वारीला गेल्यावर महाराज साध्या तंबुत राहत. एवढे अधिकार, एवढे वैभव असूनही महाराज साधेपणाने वागायचे. संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला महाराज प्रोत्साहन द्यायचे, त्यांचे मनोबल वाढवायचे, त्यांना प्रेरित करायचे, त्यांचा उत्साह वाढवायचे.

७) संयम आणि सुरक्षितता

छत्रपती शिवाजी महाराज नेहमी संयमाने वागायचे. शिवराय विवेकी होते. शत्रूने कितीही मोठे सैन्य घेऊन स्वारी केली, तरी संयमितपणे, सारासार विचार करूनच ते आपल्या मोहिमा आखायचे. आपल्या मावळ्यांसाठी महाराजांनी विटा नावाचे एक हत्यार बनवले. विटा म्हणजे पुन्हा पुन्हा वापरता येईल असा भाला. हे हत्यार वापरून फक्त तीनशे मावळ्यांनी एक प्रसंग आपल्या रक्ताने इतिहासात कोरून ठेवला, तो म्हणजे पावन खिंडची घटना.

८) गनिमी कावा आणि दुर्गम गड-किल्ले

गनिमी कावा हे शिवाजी महाराजांचे प्रमुख हत्यार होते. अनेक मोहिमा, लढाया शिवाजी महाराजांनी गनिमी कावा करून जिंकल्या. स्वराज्य स्थापन करताना शिवाजी महाराजांनी शेकडो किल्ले बांधले आणि जिंकले. हिंदवी स्वराज्यात शिवाजी महाराजांकडे ४०० गड-किल्ले होते, असे सांगितले जाते.

# लवुळमध्ये शॉर्टसर्किटमुळे ६ एकर ऊस जळून खाक

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील लवुळ क्रमांक १ येथील दोन शेतकऱ्यांचा सहा एकर ऊस जळून खाक झाला आहे. तसेच अंबा, लिंब, सागवान, चिकू आदी झाडेही जळली आहेत. सदरील घटना दि.३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

गेल्या ८-१० दिवसांपासून सूर्य आग ओकत असल्याने प्रचंड तापमान वाढलेले आहे. अशा या भर उन्हाळ्यात तालुक्यातील लऊळ क्रमांक १ येथील शेतकरी मसुराम व्यंकटराव डोणे, भगवान बाबुराव रासवे या शेतकऱ्यांचा शॉर्टसर्किटमुळे प्रत्येकी तीन-तीन एकर असा एकूण ६ एकर ऊस जळून खाक झाला आहे. तसेच या आगीत मसुराम डोणे यांच्या शेतातील आंबा, लिंब, सागवान, चिकू आदी फळांची झाडेही जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. सदर भयान रुद्रावतार घेतलेल्या आगीला गावकऱ्यांनी विझवण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र काही उपयोग झाला नाही. सहा एकर ऊस आणि फळ झाडे ही जळून खाक झाले आहेत. ही घटना दि.३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.





# यशवंत हॉस्पीटलमध्ये लसीकरणाला प्रतिसाद

प्रतिनिधी

माजलगाव : वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लसीकरणाला देखील अधिक गती मिळावी म्हणून राज्य शासनाने राज्यात एकूण १३४ खाजगी रुग्णालयांना शासनाने ठरवून दिलेल्या दराने सशुल्क लसीकरणासाठी परवानगी दिली असून येथील यशवंत हॉस्पिटल हे तालुक्यातील पाहिले खाजगी लसीकरण केंद्र ठरले आहे. दरम्यान, लसीकरणाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

येथिल शासकीय रुग्णालयात वय वर्ष ४५च्या पुढील नागरिकांना लसीकरण शासनाच्या निर्देशानुसार सुरू होते. एक एप्रिल म्हणजेच आज पासून लसीकरण हे १८वर्ष च्या पुढे वय असणाऱ्या सर्वांसाठी शासनाने सुरू केले आहे. शासकीय रुग्णालया पाठोपाठ आता खाजगी रुग्णालयातूनही लस उपलब्ध व्हावी तसेच लसीकरण सुलभ व्हावे या हेतूने शासनाने राज्यातील एकूण १३४ खाजगी रुग्णालयांना लसीकरणासाठी परवानगी दिली असून त्यात माजलगाव येथील यशवंत हॉस्पिटलचा समावेश करण्यात आला आहे. हॉस्पिटलकडे उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ तसेच कोविड रुग्णालयाच्या माध्यमातून हॉस्पिटल बजावत असलेल्या कामगिरीची दखल घेत मागणी न करता देखील शासनाने लसीकरणाची परवानगी देउन दाखवलेल्या विश्वासाबद्दल डॉ.यशवंत राजेभोसले यांनी शासनाचे आभार व्यक्त केले असून लसीकणासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. लसीकरणासाठी डॉ.भाग्यश्री सोळंके, पंकज शिनगारे, श्रीमती धम्मा टाकणखार, मनिषा शिनगारे इत्यादी हॉस्पिटलला लसीकरण केंद्रात असतील. खाजगी लसीकरण सुरू होताच पहिल्याच दिवशी ५० जणांना लस देण्यात आली. यावेळी जयमहेश कारखान्याचे चीफ अकाऊटंट महेंद्र बाविसताले यांना पहिली लस देऊन लसीकरणास सुरुवात करण्यात आली, प्रसंगी डॉ.यशवंत राजेभोसले यांच्यासह डॉ.भाग्यश्री सोळंके, सर्व स्टाफ उपस्थित होता.



जयमहेश करखान्यावरील सुमारे ४०० कर्मचारी व त्यांच्या नातेवाईकांना कामाच्या वेळेच्या नियोजनानुसार लसीकरण करून घेतले जाणार असल्याची माहिती कारखान्याचे चीफ अकाउंटंट महेंद्र बावीसताले यांनी दिली. खाजगी रुग्णालयाला लसीकरणाची परवानगी मिळाल्यामुळे लसीकरणाला वेग येणार असून आगामी काळात कोरोनावर नियंत्रण मिळण्यात मोठी मदत होणार असल्याने सर्वसामान्यांमधून शासनाच्या निर्णयाचे स्वागत होताना दिसत आहे.



# माजलगावात शिवसैनिकांचा सन्मान

प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव नगरीचे माजी उपनगराध्यक्ष सुनिलराव खंडागळे यांच्या संपर्क कार्यालयात तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिवजयंतीनिमित्त शिवसैनिकांचा सन्मान करण्यात आला.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार दि.३१ मार्च रोजी माजी उपनगराध्यक्ष सुनिलराव खंडागळे यांच्या संपर्क कार्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली.

यावेळी शिवसैनिकांचा सत्कार करण्यात आला. कोरोना-१९ च्या नियमांचे पालन करण्यात आले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष तुकाराम येवले, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रामराजे सोळंके, डॉ.उध्दव नाईकनवरे, विकास झटे, रामभाऊ कुलकर्णी, सुरेश जाधव, नानासाहेब घोडके, पप्पू राऊत, जगताप सर, उत्तम पवार, योगेश तौर आदी उपस्थित होते.

# अनघा मुळी यांचे हृदयविकाराने निधन

प्रतिनिधी



माजलगाव : येथील ट्विंकल स्टार इंग्लिश स्कूलच्या संचालिका सौ.अनघा अमोल मुळी (४० वर्ष) यांचे शनिवारी ऱ्हदयविकाराने निधन झाले. त्यांचेवर रविवारी सिंदफणा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती अनमोल इलेट्रीकल्सचे अमोल मुळी, दोन लहान मुले असा परिवार आहे. येथील टेंबे गणेश मंडळाचे कार्यकर्ते अमोल मुळी यांच्या त्या पत्नी होत. मुळी परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान परिवार सहभागी आहे.

## युवा नेते बाळासाहेब सांगळे यांचा गौरव





दिंद्रुड : चाटगावचे माजी सरपंच तथा युवा नेते भागवत ऊर्फ बाळासाहेब सांगळे यांचे वाढदिवसानिमित्त प्रतीक देशमाने फाऊंडेशनतर्फे अभिष्टचिंतन करताना ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने, वर्तमानचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, सामाजिक कार्यकर्ते बालासाहेब हांगे, श्रीहरी देशमाने, रमेश तिडके, सतिश देशमाने, सिध्दार्थ देशमाने आदी.

# मंगरूळ उपकेंद्रात कोविड लसीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील किट्टीआडगाव प्रा.आ.के.अंतर्गत मंगरुळ क्र.१ आरोग्य उपकेंद्रात दि.५ एप्रिल रोजी प्रदिप मोहनराव घाटुळ यांच्या हस्ते कोविड लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला या लसीकरणाला ४५ वर्षावरील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून एका दिवसात तब्बल १०० लोकांना लस देण्यात आली.

सोमवारी तालुक्यातील मंगरुळ क्र.१ उपकेंद्रात कोवीड लसीकरणाचा शुभारंभ झाला आरोग्य विभागाच्या सि.एच.ओ. डॉ.रोहीणी टाकणखार, उपकेंद्राच्या ए.एन.एम.श्रीमती वाघमारे, ए.एस.जाधव, एम.पी.डब्लीव, यांनी केलेल्या आवहानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून तब्बल १०० नागरिकांना लस देण्यात आली. या लसीकरण मोहिमेसाठी ए.एन.एम. अनिता पवार, आरोग्य सेवक पांडुरंग होके, आशावर्कर उषा औसे, कोमल लांबुड,पार्टटाईम तुळजाई शेटे यांनी परिश्रम घेतले. कोविड लस केंद्राअंतर्गतील सर्व नागरिकांनी घेवून कोरोनाला रोखण्याचे काम करुन आरोग्य खात्यास सहकार्य करावे असे आवाहन सि.एच.ओ.रोहीणी टाकणखार यांच्यासह परिचारिका ए.एस. वाघमारे यांनी केले आहे.

# देवडीत महावितरणच्या कार्यालयावर शेतकऱ्यांचा ठिय्या

प्रतिनिधी

वडवणी : तालुक्यातील देवडी येथील सबस्टेशन अंतर्गत ७ गावांचा सामावेशक आहे. या सात गावात गेल्या २ दोन महिन्यांपासन लाईट दोन तास सुद्धा पूर्ण क्षमतेने चलत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक पाण्याअभावी जळुन खाक होत असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. या सबस्टेशनची वीज बील वसुली पूर्ण झाली आहे. तरी सुद्धा लाईट सुरूळीत पूर्ण क्षमतेने चलत नाही. म्हणून शेतकऱ्यांनी सबस्टेशनवर ठिय्या आंदोलन केले.




शेतकऱ्यांची प्रमुख मागणी ही सलग १० तास पूर्ण क्षमतेने लाईट सुरूळीत सुरू करा. उपअभियंता चोले यांनी शेतकऱ्यांच्या मागणीचे निवेदन स्विकारले असून सहा तासांची लाईट ८ ते १० तास करू आणि चांगल्या क्षमतेने वीज पुरवठा करून यासाठी चिंचाळा सबस्टेशन वरून नविन लाईटलाईनसाठी प्रयत्न करू असे सांगण्यात आले. या निवेदनावर मच्छिंद्र झाटे, भारत बादाडे, भागवत अंबुरे, अतुल झाटे, रामप्रसाद आगे, श्रीराम बादाडे, प्रदीप गिलबीले, ओम पुरी, बालासाहेब राऊत, जालिंदर झाटे, भारत निसर्गध, दिपक अंबुरे, गोरख झाटे आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कुटे ग्रुपचे संस्थापक ज्ञानोबाराव कुटे यांचे निधन

प्रतिनिधी

बीड : गेल्या ५० वर्षापेक्षा अधिक काळापासून व्यवसायात असलेल्या कुटे ग्रुपचे संस्थापक ज्ञानोबाराव कुटे (वय ८५) यांचे



ज्ञानोबाराव कुटे वृध्दाप काळाने १ एप्रिल रोजी सोलापूर येथे उपचारादरम्यान निधन झाले. गुरुवारी उशिरा तिरूमला रिफायनरी, मोची पिंपळगाव रोड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.ज्ञानोबाराव कुटे यांनी कुटे उद्योग समुहाची मुहूर्तमेढ ५० वर्षापूर्वी कापड दुकानाच्या माध्यमातून रोवली होती. पुढे त्यांचा मुलगा सुरेश ज्ञानोबाराव कुटे आणि अर्चना सुरेश कुटे यांनी या उद्योग समुहाला जगाच्या पटलावर आणले. माथी चंदनाचा टिळा, गळ्यात तुळशीची माळ आणि पांडुरंगाचे नामस्मरण करत असत. त्यांच्या निधनाने कुटे ग्रुपचा आधारवड कोसळला आहे. कोरोनाचे संकट असल्यामुळे कुटे परिवारावर प्रेम करणाऱ्या सर्व स्नेहीजनांनी घरामध्येच ज्ञानोबाराव कुटे यांना श्रध्दांजली अर्पण करावी, असे आवाहन कुटे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे आणि कुटे ग्रुप परिवार आहे.



वडवणी : तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी तथा हैदराबादस्थित सामाजिक कार्यकर्ते धम्मपाल राऊत- मयुरी राऊत यांची कन्या स्वरणिका हिचा द्वितीय वाढदिवस बच्चे कंपनीच्या साक्षीने विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला.

# कृषी संस्कृती सर्वोत्कृष्ट : पंडीत उद्धव आपेगावकर

प्रतिनिधी

अंबाजोगाई : कृषी संस्कृती ही इतर सर्व संस्कृतीपेक्षा सर्वश्रेष्ठ संस्कृती असल्याचे मत आंतरराष्ट्रीय किर्तीचे पखवाज वादक पंडीत उध्दव आपेगावकर यांनी येथील कृषी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केले.



कृषी महाविद्यायाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा समारोप दि.३० मार्च रोजी पंडीत उध्दवबापू आपेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषी महाविद्यालय अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे हे तर प्रमुख अतिथी म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कार्यकारी परिषद सदस्य राहुल सोनवणे, मोरेवाडीचे माजी सरपंच वसंतराव मोरे, अंबा सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष हनुमान मोरे, बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख हे व्यासपीठावर उपस्थित होते तर कविराज कचरे, राहुल मोरे, डॉ.संजय मोरे यांची विशेष उपस्थिती होती.



# कोरोना लढ्यात शासकीय रुग्णालय २४ तास ‘ऑनड्युटी’

▶ भगीरथ तोडकरी



माजलगाव : कोरोना वैश्विक महामारीच्या दुसऱ्या लाटेचा सामना सर्वजण करत असताना शासकीय ग्रामीण रूग्णालय मात्र २४ तास तत्पर राहून सेवा देत आहे. शासनाचे एक पाऊल पुढे म्हटल्याप्रमाणे अग्रेसर राहून माजलगावचे शासकीय ग्रामीण रूग्णालय रूग्णांना सेवा देत आहे.

गेल्या २२ मार्च २०२० पासून ४ एप्रिल २०२१ पर्यंत शासकीय रूग्णालयाने १६१३५ जणांच्या अॅन्टीजेन टेस्ट केल्या आहेत. तर आरटीपीसीआर तपासण्या झालेल्या आहेत. माजलगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांनी दिलेल्या माहितीनुसार आत्तापर्यंत १७८७ रूग्ण कोविडमुक्त झाले आहेत. तर सध्या १५९ रूग्ण उपचार घेत आहेत. एकूण कोरोनाबाधितांची संख्या तालुक्यात १९९२ वर गेली आहे. तर ४६ जणांचा मृत्यू झाला आहे. शासन कोरोनाशी मुकाबला करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. त्याला जनतेने सुध्दा मोठा प्रतिसाद देण्याची गरज आहे. जनतेमध्ये जनजागृती होत असली तरी कोरोना लढा ही माझी जबाबदारी आहे, हे ओळखणे गरजेचे आहे, असेही ’वर्तमान’शी बोलताना डॉ.घुबडे म्हणाले. माजलगाव ग्रामीण रूग्णालयात चार तज्ज्ञ डॉक्टर्सची टीम सक्रीय कार्यरत आहे.

त्यात वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे (जनरल सर्जन), डॉ.गजानन रूद्रवार (छाती विकार तज्ज्ञ), डॉ.प्रसाद कुलकर्णी (बालरोग तज्ज्ञ), डॉ.प्रविण वारकरी (पॅथॉलॉजिस्ट) आदींचा समावेश होतो. रूग्णसेवेत काही अडचणी येऊ नयेत यासाठी शासकीय ग्रामीण रूग्णालयातील स्टाफ २४ तास तत्पर आहे. त्यासाठी ७ शिफ्टर कार्यरत आहेत. अधिकारी, कर्मचारी असे मिळून एकूण ७२ जणांचा स्टाफ, १ रूग्णवाहिका त्याशिवाय १०८ क्रमांक डायल करून उपलब्ध होणारी अत्याधुनिक रूग्णवाहिकाही आहेत.



### आत्तापर्यंत ५७९१ जणांना लस

गेल्या २५ जानेवारीपासून माजलगाव ग्रामीण रूग्णालयात कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला प्रारंभ झाला. ४ एप्रिलपर्यंत ५७९१ जणांना लस देण्यात आली असल्याची माहिती स्टाफ नर्स एस.आर.पठाण यांनी दिली. लसीकरण मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत असला तरी आणखी व्यापक जनजागृती होण्याची गरज असल्याचे पठाण म्हणाल्या. ४५ वर्षापुढील नागरिकांना ही लस देताना त्यांची ऑनलाईन नोंदणी केली जात आहे, अशी माहिती देण्यात आली.

### डॉक्टर, परिचारीकांकडून रुग्णांना मानसिक आधार

कोरोनाग्रस्त रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मानसिक आधाराची गरज असते. रुग्णांना औषधोपचार करण्याबरोबरच त्यांच्या मनातून कोरोनाची भिती कमी करण्याचे महत्त्वाचे काम परिचारीका व डॉक्टर्सकडून केले जात आहे. रुग्ण दाखल होतो त्याच दिवसापासून ’तुम्हाला फार काही त्रास नाही, अगदी चार-पाच दिवसात तुम्ही बरे व्हाल. तुमच्यापेक्षा वयाने जास्त असलेले व अधिक त्रास असलेले रुग्ण येथे दुरुस्त झाले आहेत. तुम्ही तर सहज दुरुस्त व्हाल’ हे शब्द त्या रुग्णाचे मनोबल वाढवणारे ठरत आहेत. यामुळे शासकीय रुग्णालयात दाखल होणारे रुग्ण अगदी पहिल्याच दिवसापासून ‘रिलॅक्स’ होत आहेत. यामध्ये परिचारीका व डॉक्टर्सचे महत्त्वाचे योगदान आहे. या आरोग्यदूतांना ‘हेल्थ प्लस’ चा सलाम!



### गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्ण संख्येत वाढ: डॉ.श्रेयस देशपांडे



गेल्या वर्षीच्या तुलनेत कोरोनाचे संक्रमण समुहामध्ये गतीने वाढत आहे, ही बाब गंभीर आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन डॉ.श्रेयश देशपांडे यांनी वर्तमानशी बोलताना केले. दरम्यान, प्रशासकीय यंत्रणा प्रभावीपणे काम करत असून खाजगी हॉस्पीटल देखिल कोरोनाबाबत अतिशय दक्ष आहेत, अशी प्रतिक्रियाही डॉ.देशपांडे यांनी दिली.

### सतर्कतेची गरज : डॉ.यशवंत राजेभोसले

कोरोनाची दुसरी लाट गंभीरतेने घेण्याची गरज आहे.



सध्याची चैन तुटली नाही तर परिस्थिती गंभीर स्वरूपाची होवू शकते. तरूण युवक रूग्णांची संख्या वाढत असल्याने प्रत्येकाने याबाबत सतर्क राहण्याची गरज आहे, अशी प्रतिक्रिया डॉ.यशवंत राजाभोसले यांनी वर्तमानशी बोलताना दिली. दरम्यान, कोरोनाचे लक्षणे आढळली तर डॉक्टरांशी त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहनही डॉ.राजेभोसले यांनी केले.

### नियमांचे पालन करा : डॉ.महेश मालपाणी

सध्या कोरोनाची सुप्त लाट सुरू आहे. त्यामुळे प्रत्येकाने



अतिशय दक्ष राहून कोरोनाबाबत शासनाने दिलेले नियम तंतोतंत पाळले, तर आपण कोरोनाला हरवू शकतो, अशी प्रतिक्रिया डॉ.महेश मालपाणी यांनी दिली. दरम्यान, कोरोनाबाबत व्यापक जनजागृती आणि सूचनांचे पालन करत जनतेने कोरोना लढ्यात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे असे आवाहनही डॉ.मालपाणी यांनी केले.



### माजलगावातील अॅब्युलन्स सेवा

| | |
|---|---|
| शासकीय ग्रामीण रूग्णालय | १०८ |
| शिवसेना | ९७६४६७३१७१ |
| अलफलाह कमिटी | ९४२१०६१७१० |
| रोटरी क्लब | ७७४४८२२१०८ |
| यशवंत हॉस्पीटल | ७५५८७१७२०९ |
| देशपांडे हॉस्पीटल | ९८२३९२१११२ |
| श्री सिध्देश्वर संकुल | ९४०३६०७४७९ |
| सफा बैतुल माल | ९३२५२५२५६३ |
| नागनाथ कार्डियाक | ८८३०२३९११९ |







**कोरोना काळात लोकदूतासारखे डॉ.वासिम मनसबदार यांचे कार्य आहे. हेल्थ प्लस विशेषांकासाठी काय आहे डॉ.वसिम मनसबदार यांची कार्यपद्धती यावर टाकलेला प्रकाशझोत.**

## कोरोनातील लोकदूत
## डॉ.वसिम मनसबदार

पात्रुड येथील मनसबदार हॉस्पिटलचे संचालक डॉ.वसिम मनसबदार हे कोरोना लढ्यात २४ तास रूग्णांना सेवा देणारे



डॉक्टर ठरले आहेत. अगदी हॉस्पिटलचे घर आणि घराचे हॉस्पिटल अशी पध्दत त्यांच्या कामाची आहे. कोरोना लढ्यात डॉ.वसिम मनसबदार हे लोकदूताची भूमिका साकारत आहेत. वर्तमान टीमशी बोलताना डॉ.मनसबदार म्हणाले ग्रामीण भागात रूग्णांना सेवा देणे हे आपले आद्यकर्तव्य असून मी हॉस्पिटलमध्ये १२ तास आणि १२ तास घरी असतो. घरीही दवाखाना सुरू केलेला आहे, अनेक रूग्ण घरी येतात त्यांनाही प्रामाणिकपणे सेवा देतो. दवाखान्यात येणाऱ्या रूग्णाकडे कधी-कधी पुरेशे पैसे नसतात. तर काहींना मोफत उपचार करावे लागतात. सामाजिक बांधिलकीच्या गप्पा मारण्यापेक्षा आपण कृतीवर भर देत असून २४ तास सेवा देणे, हेच आपले सथ सर्वोच्च प्राधान्य आहे. कोरोना लढ्यात आपल्या ज्ञानाचा, आपल्या अनुभवाचा उपयोग होणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले. डॉ.वसिम मनसबदार हे गेल्या १६ वर्षापासून वैद्यकीय व्यवसायात आहेत. त्यांचे आजोबा सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते, तोच वारसा त्यांच्या वडीलांनी जपला आणि आता त्याच मार्गावर डॉ.वसिम मनसबदार चालत आहेत. त्यांच्या कार्याला ’हेल्थ प्लस’चा सलाम!



# ’गोवर्धनस्’ची फिजिओथेरपी ठरतेय रूग्णांसाठी वरदान

▶ प्रतिनिधी

स्पॉन्डेलोसिसपासून अर्धांगवायूपर्यंत खात्रीशीर इलाज माजलगावस्थित गोवर्धनस् फिजिओथेरपी क्लिनिकमध्ये होत असून रूग्णांना आजाराबाबत योग्य मार्गदर्शन व्हावे, यासाठी तपासणी शिबीराचे आयोजन केले जाते, अशी माहिती संचालिका डॉ.राधिका बजाज यांनी ’वर्तमान’च्या हेल्थ प्लस विशेषांकाच्या निमित्ताने दिली.

गोवर्धनस् फिजिओथेरपी क्लिनिकमध्ये स्पॉन्डेलोसीस, अर्धांगवायू, तोंड वाकडे होणे, संधिवात, मणक्याची गादी सरकणे व पायाला मुंग्या व बधिरपणा येणे, शस्त्रक्रियेनंतरचे व्यायाम व उपचार, गुडघेदुखी, मानदुखी, फेशियल पाल्शी, सेरेब्रल पाल्सी, हात-पाय बधीरता, स्पोर्टस्



दुखापती आदींसह विविध आजारांवर खात्रीशीर तपासणी करून इलाज केले जातात. बदलत्या जीवनशैलीत विविध सांधेदुखीने रूग्ण त्रस्त असतात, अशावेळी आधुनिक तंत्रज्ञानासह तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाते. माजलगाव शहरात गोवर्धनस् फिजिओथेरपी क्लिनिकच्या माध्यमातून विविध व्याधींनी त्रस्त झालेल्या रूग्णांना दिलासा मिळत अशा प्रतिक्रिया वर्तमानशी बोलताना रूग्णांनी दिल्या. अर्धांगवायूच्या विविध प्रकारांवर फिजिओथेरपी तपासणी आणि उपचार वरदान ठरत असून अशा आजारांवर ’गोवर्धनस’मध्ये इलाज केला जातो, अशी माहिती डॉ.राधिका बजाज यांनी दिली. फिजिओथेरपी वरदान ठरत असलेल्या या कार्याला ’हेल्थ प्लस’चा सलाम!

# अविरत रूग्णसेवेची साडेतीन दशके

## डॉ.श्यामसुंदर काकाणी यांचा प्रेरणादायी प्रवास

▶ प्रतिनिधी



माजलगाव : आरोग्य क्षेत्रात गेली ३५ वर्ष अविरत रूग्णसेवा करणारे डॉ. श्यामसुंदर काकाणी यांचे आरोग्य क्षेत्रातील काम दिशादर्शक आणि प्रेरणादायी आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन शाखा माजलगावचे अध्यक्ष या नात्याने कोरोना काळातही एखाद्या योध्दासारखे लढत आहेत.

डॉ.काकाणी यांच्या नावावर अनेक विक्रम प्रस्थापित आहेत. बालरोगांविषयी अत्याधुनिक सुविधा माजलगावात पहिल्यांदा डॉ.काकाणी यांनी उभारली. निष्णात तज्ज्ञ असलेल्या डॉ.श्यामसुंदर काकाणी यांनी रूग्णांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य मानून गेली ३५ वर्ष अविरत कार्य सुरू आहे. कांगारू मदर केअर ही दुर्मिळ आजारांवर आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपचार पध्दती बीड जिल्ह्यात प्रथम सुरू करण्याचा डॉ.काकाणी यांना जातो. दुर्मिळ आजारांवर काम करत असताना मराठवाडा आणि राज्य पातळीवर बालरोग तज्ज्ञांना प्रशिक्षित करण्याचे काम डॉ.काकाणी सर्व व्याप सांभाळून करत आहेत. जिल्ह्यात पहिल्यांदा सोनोग्राफी सुविधा सुरू करण्याचा मानही त्यांनाच जातो. १९९३ साली गर्भ सोनोग्राफीचे प्रशिक्षण घेऊन रूग्णांना दिलासा देत योग्य निदान आणि उपचार केले. २००७ साली नवजात अर्भक पुनरूज्जीवन या महत्त्वाच्या विषयावर राष्ट्रीय व्याख्याता म्हणून डॉ.श्यामसुंदर काकाणी यांची निवड झाली. राष्ट्रीय व्याख्याता म्हणून काम करत असताना देशपातळीवरील विविध बालरोग तज्ज्ञांना मार्गदर्शन आणि सल्ला देण्याचे काम डॉ.काकाणी यांनी केले. राष्ट्रीय व्याख्याता म्हणून त्यांची नियुक्ती झाली, त्याचा अनेक रूग्णांना लाभ झाला. गेली ३५ वर्ष बालरोग तज्ज्ञ म्हणून माजलगाव शहर, परिसर, तालुका आणि जिल्ह्यातही अनेक नवजात बालकांना जीवदान देण्याचे काम त्यांनी केले आहे.



**इ.स.२००७ मध्ये आंतरराष्ट्रीय सोनोग्राफी परिषदेत जगविख्यात शास्त्रज्ञ प्रो.डॉ. फिलीप जियान्टी यांच्या समवेत डॉ.श्यामसुंदर काकाणी आणि डॉ.सौ.सुनंदा काकाणी.**

### गर्भातही कोरोना होण्याची भीती

कोरोना महामारीशी आपण सर्वजण लढत आहोत. त्याचा मुकाबला मोठ्या हिंमतीने करण्याची गरज आहे. कोरोना हा अतिसंसर्गजन्य रोग असल्याने त्याकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे, असे आवाहन वर्तमानशी बोलताना डॉ.श्यामसुंदर काकाणी यांनी केले. कोरोना रूग्णांचे मृत्यूचे प्रमाण वाढल्याने ही गंभीर बाब आहे. कोरोना नवजात शिशुला गर्भातही होवू शकतो, अशी भीती डॉ.काकाणी यांनी व्यक्त केली आहे.

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**